# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

गणेशखिंड, पुणे - ४११००७

# Savitribai Phule Pune University

Ganeshkhind, Pune – 411007

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

दूरध्वनी क्रमांक : ०२०– २५६२११५६/५७/७९
Telephone : 020-25621156/57/79
ईमेल/ Email : boards@pun.unipune.ac.in

शैक्षणिक विभाग (मान्यता कक्ष)
Academic Section (Approval Cell)
वेबसाइट/ Website: www.unipune.ac.in


## परिपत्रक क्र.२०२/२०२३

## (शुद्धीपत्रक)

विषय :— 'उन्हाळी परीक्षा २०२३' च्या अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना पुढील वर्षामध्ये विशेष प्रवेश संधी बाबत....

विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, उन्हाळी २०२३ विज्ञान व तंत्रज्ञान, वाणिज्य व व्यवस्थापन, मानवविज्ञान व आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखांतील पदवी (इंटिग्रेटेड अभ्यासक्रमांसह) परीक्षेमध्ये अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना पुढील वर्गामध्ये विशेष प्रवेश संधी देण्याच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने मान्यता देण्यासंदर्भात विद्यापीठाचे परिपत्रक क्र. १९७/२०२३ निर्गमित करण्यात आलेले आहे.

सदर परिपत्रक निर्गमित झाल्यानंतर ५ वर्ष कालावधीचा विधी अभ्यासक्रम **(B.A.LL.B., B.B.A.LL.B.)** तसेच वास्तुशास्त्र अभ्यासक्रम **(B.Arch.)** यांनाही उक्त संधी देण्याबाबत विद्यापीठाकडे विनंती पत्र प्राप्त झाली. याचा विचार करून ५ वर्षे कालावधीचे **B.A.LL.B., B.B.A.LL.B. आणि B.Arch.** या अभ्यासक्रमासांठी सदर परिपत्रक योग्य त्या फेरफारासह लागू करण्यात येत आहे.

**B.A.LL.B., B.B.A.LL.B. आणि B.Arch.** हे अभ्यासक्रम पाच वर्षांचे असल्यामुळे तृतीय वर्षाच्या अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना पाचव्या वर्षात तात्पुरता प्रवेश काही अटी व शर्तीच्या अधिन राहून देण्यात यावा व त्याबाबतचे विहीत हमीपत्र प्रवेश घेणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याने महाविद्यालयाकडे सादर करणे अनिवार्य असेल व सत्र नऊ व दहा करिताच्या सत्र समाप्तीच्या लेखी परीक्षा संबंधित विद्यार्थ्यांना एकत्रित अर्थात उन्हाळी (२०२४) च्या परीक्षांमध्ये देता येतील.

परिपत्रक क्र. १९७/२०२३ मधील इतर अटी व शर्ती उपरोक्त अभ्यासक्रमांनाही जशाच्यातशा लागू राहतील.

मा. प्राचार्य/संचालक, सर्व संबंधित संलग्न महाविद्यालये/परिसंस्था यांना विनंती की, सदर परिपत्रकाचा आशय सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावा.

गणेशखिंड, पुणे – ४११००७
जा. क्र. :– सीबी/८४५
दिनांक :– १३/०९/२०२३

(डॉ. मुंजाजी रासवे)
उपकुलसचिव

प्रत माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी:–

१. मा. अधिष्ठाता, सर्व विद्याशाखा, प्रस्तुत विद्यापीठ
२. मा. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, प्रस्तुत विद्यापीठ
३. मा. प्राचार्य/संचालक, सर्व संलग्न महाविद्यालये व परिसंस्था
४. मा. उपकुलसचिव, शैक्षणिक प्रवेश विभाग, प्रस्तुत विद्यापीठ
५. सहायक कुलसचिव, शैक्षणिक पात्रता विभाग, प्रस्तुत विद्यापीठ

मा. विद्यापरिषद ठराव क्र. – अ १ पीए/१/२०२३ दि. ४ सप्टेंबर, २०२३
टिपणी क्र. व्ही.सी. ४०४३ दि. १३ सप्टेंबर, २०२३